सी.बी.टी. प्रकाशन

# चिटकू



BVBK-0402784

# चिटकू

लेखिका **सुरेखा पाणंदीकर**
अनुवाद **अरुंधती देवस्थळे**
चित्रांकन **मृणाल मित्रा**




BVBK-0402784

CHITKU (Marathi)

© by CBT 1991

ISBN 81-7011-499-3

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नवी दिल्ली



''ची ss ज'' चिटकू चित्कारला. त्याला चीजचा वास आला होता. चिटकू हे उंदराचं पिटुकलं आता चीजच्या शोधात टुणटुणत होतं. परंतु स्वयंपाक घरात, टेबलावर, कपाटात, स्टोव्हखाली, फ्रीजमागे. कुठेच चीज सापडत नव्हतं. चित्कारतच तो स्वयंपाकघराबाहेर आला. आईला आपला नक्कीच राग येणार हे त्याला माहीत होतं. कारण ''स्वयंपाकघरातल्या आपल्या बिळापासून फार दूर जाऊ नकोस,'' असं तिने त्याला बजावलं होतं.

पण चिटकू कुठला ऐकायला! चीजच्या वासाने त्याच्या तोंडाला पाणी सुटलं होत. चीजचा वास त्याला खेचत होता आपल्याकडे आणि तो स्वतः ला आवर घालू शकत नव्हता.

त्याने एका मागून एक सगळ्या खोल्या शोधल्या. आणि तो शेवटी मुन्नूच्या खोलीत आला.

''चीज! सापडलं एकदाचं!'' तो पुस्तकांच्या शेल्फवर उडी मारून म्हणाला.

चीजच्या वासाने चिटकूचं नाक हुळहुळत होतं. चिटकूला मुन्नू त्याच्या पलंगावर बसून पुस्तक वाचतावाचता चीज सँडविच खाताना दिसला.

शेल्फवरुन उडी मारून चिटकूने पलंगावर धाव घेतली व आरामात बशी शेजारी बसून चवदार सँडविच कुरतडण्यास सुरुवात केली.

मुन्नू पुस्तक वाचण्यात एवढा रंगून गेला होता की त्याचं हया आगंतुकाच्या खोडयांकडे लक्षच नव्हतं. त्याने दुसरा सँडविच उचलण्यासाठी बशीकडे हात लांबवला.

''आऊच'' मुन्नू ओरडला. त्याच्या बोटाला काही तरी बोचलं होतं. त्याने वळून पाहिलं तर चिटकू पलंगावरून निसटण्याच्या बेतात होता.





प्र. श्री. वं. डावें, ग्रंथालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
ना. क्र. दिनांक
विषय क्र.



ठाणे, वाचनालय
बाल वाङ्मय
क्र. २७८४
दिनांक

''खोडयाळ प्राण्या! मला चावतोस काय!'' मुन्नू हॉकी-स्टीकसह पलंगावरून खाली उतरत म्हणाला, ''मी तुला असा धडा शिकवेन की तू जन्मभर विसरणार नाहीस''.

''पळ, माझ्या पिल्ला पळ.'' त्याला आईचं ओरडणं ऐकू आलं. ती त्याला शोधता शोधता तिथे आली होती. चिटकू कसाबसा निसटला. पण तरी त्याच्या शेपटीवर मुन्नूच्या हॉकी-स्टीकचा फटका बसलाच होता.



स्वयंपाकघरातील सिंकच्या खाली केलेल्या त्यांच्या बिळात चिटकू वेदनेने कळवळत होता आणि त्याची आई त्याला शांत करत होती.

''नीट ऐक, माझ्या बाळा'', ती म्हणाली, मला सोडून एकटा बाहेर जाऊ नकोस हे मी तुला किती वेळा सांगत असते. तू अजून खूप लहान आहेस. या वेळेला सुटलास, पण पुढल्या खेपेला सुटशीलच असं नाही.''

''ची! ची!'' चिटकूने आज्ञाधारकपणे मान डोलावली. पण जरा बरा झाल्यावर नेहमीसारखा खेळू, बागडू लागला, खोडचा उचापती करू लागला.




यावेळी टेबलावर पडलेल्या लाडूंच्या बशीवर त्याची नजर गेली.

"अरे व्वा छान. आसपास को ss णी नाही," तो स्वतः शीच पुटपुटला, "थोडंस खाऊन घ्यावं आणि पटकन बिळात आईच्या कुशीत शिरायला जावं."

त्याने टेबलावर उडी घेतली. ओ हो! काय काय जिन्नस रचून ठेवलेले दिसले त्याला. केक, सँडविचेस, हरभऱ्याची उसळ आणि पुऱ्या! चिटकूच्या तोंडाला पाणी सुटलं. तो मनाशी म्हणाला. "लाडूपासून सूरुवात करतो आणि मग थोडी थोडी



प्रत्येकाची चव घेतो.'' लाडवांच्या ढिगावर चढून आरामात
सगळयात वरचा लाडू खायला सुरुवात केली.



"ताई लाडू आण लौकर" शेजारच्या खोलीतून मुन्नू ओरडला आणि त्याच वेळेला त्याची बहिण रितू घाईघाईने लाडूंची बशी न्यायला खोलीत आली.




"ई ss क ..... उंदीर!" ती ओरडली. तिने बशी टेबलावरच टाकली व बाहेर धूम ठोकली. सगळे लाडू गडगडत खाली आले.

२७८४

"ची! ची! ची!" चिटकू ओरडला. तो लाडवांच्या ढिगाऱ्याखाली दबून गेला होता. त्याची फक्त शेपटी व नाकाची बोंडी बाहेर दिसत होती. त्याची आई धावत धावत त्याच्या मदतीला आली व तिने ढिगाऱ्याखालून त्याची सुटका केली.

मुन्नू आणि त्याची आई धावतच खोलीत आले, तेव्हा त्यांना दोन उंदीर बिळात शिरताना दिसले.






“फारच शेफारले आहेत हे उंदीर!'' मुन्नूची आई रागाने म्हणाली, ''सगळे लाडू वाया गेले. त्यांना हटवायला आपल्याला एक मांजर आणायला हवं.''

मग काय! दोन दिवसांतच चिटकूची आई काहीतरी खाणं शोधायला बाहेर आली तेव्हा तिला घरात एक मांजर आणलेलं दिसलं.

''चिटकू!'' तिने चिटकूला सावध करत म्हटलं, ''आता घरात मांजर आलं आहे. मांजर म्हणजे आपला सर्वांत मोठा शत्रू. त्याच्या हाती सापडलास तर खेळ संपलाच समज. म्हणून, माझ्या बाळा, सावध रहा, एकटा बाहेर पडू नकोस.''

पण चिटकूने तर मांजर कधी पाहिलंच नसल्याने त्याला फारशी भीती वाटत नव्हती. दुसऱ्याच दिवशी आई बिळाबाहेर गेल्याची संधी बघून चिटकूसुध्दा बिळाबाहेर पडला.

त्याला बाहेर टाळया वाजवून गाणी म्हणण्याचा व घंटेचा आवाज ऐकू आला.





देवघरात चोरपावलांनी जाता जाता त्याच्या डोक्यात विचार आला,

''काय चाललंय हे?''

तेवढयात गाण्याचा आवाज थांबला. मुन्नूचे वडील प्रसाद वाटत होते. तेव्हा चिटकू मुलांच्या नजरेला पडला.

''कुठं आहे ते मांजर?'' मुन्नू ओरडला, ''या बदमाश उंदरावर सोडा त्याला.''

''नको रे मुन्नू,'' त्याची आई म्हणाली, ''आज नको, अरे आज गणेशचतुर्थीचा दिवस आहे हे विसरू नकोस. आणि उंदीर गणेशाच लाडकं वाहन नाहीं का?

चिटकूला आणखी एकदा जीवदान मिळालं. परत जाऊन तो आईला बिलगला. हमसाहमशी रडत त्याने तिला घडलेली कहाणी सांगितली.

क्र. २७८
विभाग ७१·७1.


"तू खरंच सुदैवी आहेस, माझ्या पिल्ला," त्याची आई रागाने आणि चिटकू सुटल्याच्या आनंदानेही म्हणाली, "पण अतिरेक करू नकोस, सावध रहा."

नंतरचे दोन दिवस चिटकू बिळातच बसून राहिला. तिसऱ्या दिवशी आईची वाट पहाता पहाता त्याला भयंकर भूक लागली दुपार टळून गेली होती आणि ती अजूनही परत आली नव्हती.

चिटकूला काळजी वाटायला लागली. मांजराने तर तिला काही केलं नसेल? मला जरा शोध घेतला पाहिजे. जर ती संकटात असेल तर तिला माझी गरज पडेल.

त्याने बाहेर येऊन स्वयंपाकघरात शोधलं. ती तिथे नव्हती. देवघर, मुन्नूची खोली, रितूची खोली, दिवाणखाना, कुठेच नाही. चिटकूला आता फारच काळजी वाटायला लागली.

सगळीकडे शोधून झालं. ती कुठेच सापडेना. कुठे गेली असेल बरं?



हं, कदाचित् कोठीच्या खोलीत असेल! त्याला सुचलं. "ची! ची ची!" त्याने तिथे जाऊन आईला हाका मारल्या. बिचारा चिटकू तेवढ्यात खिडकीतून मांजर उडी मारून आत आल्याचं त्याला कळलचं नाही.

"म्याऊ" ते ओरडलं, "या वेळेला मात्र मी तुला सोडणार नाही." चिटकूने भर्रकन मागे वळून धूम ठोकली.


त्याच्या मागे मांजर धावले. टेबलांखालून, पोत्यांमागून व भांडयांमधून पळापळीला सुरुवात झाली.

धुडुम! चिटकूने मसाल्याच्या उघडया पडलेल्या डब्यावर उडी घेतली. आतील सर्व वस्तू बाहेर पडल्या व जमिनीवर पसरल्या त्या पसाऱ्यातून पळताना चिटकूचा पाय घसरला व मांजराने त्याच्यावर झेप घेतली.

"ची! ची! ची!" चिटकू चित्कारला. मांजराच्या पंज्याखाली तो कळवळत होता, "आई , आई ग"!आई दिसली, पण तोवर चिटकूने जगण्याची आशा सोडून दिली होती.








पोत्यामागून ती हतबल होऊन त्याच्याकडे बघत होती.
"ची! ची! ची! वाचव! वाचव!" तो निराश होऊन ओरडू लागला. त्याची शेपटी जोरात वळवळत होती.

पण इतक्यात 'आक्शी! आक्शी!' करत मांजर शिंका देऊ लागलं. चिटकूची मसाल्याने माखलेली शेपटी मांजराच्या नाकातोंडाला लागल्यामुळे त्याला शिंका येऊ लागल्या होत्या. मग काय? त्याची उंदरावरील पकड ढिली झाली...

विजेच्या चपळाईने चिटकू मांजराच्या क्रूर पंज्याच्या तावडीतून सुटला व आईच्या कुशीत शिरला.



ठाणे,
२७८४

'आक्शी! आक्शी!' मांजर शिंका देत राहिलं.

वाङ्मय विभाग
२७८४ दिनांक
विषय
BVBK-0402784



चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नेहरु हाउस, 4 बहादुरशाह ज़फर मार्ग, नवी दिल्ली द्वारा प्रकाशित व ट्रस्ट च्या
इंद्रप्रस्थ प्रेस नवी दिल्ली मध्यें मुद्रित.

Rs. 8.00 M 27

ISBN 81-7011-499-3